बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5

वृत्तपत्रीय निवेदन

## माननीय वित्तमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांना बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे लाभांशापोटी रु ७९४.९४ कोटीचा धनादेश सादर

पुणे दिनांक २० जून २०२३. : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे वित्तीय वर्ष २०२२ – २३ च्या लाभांशापोटी रु ७९४.९४ कोटी रकमेचा धनादेश केंद्रीय वित्तमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांना सुपूर्द करण्यात आला. बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी बँकेचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार व श्री आशिष पांडे आणि वित्तीय सेवा विभागाचे सयुंक्त सचिव श्री समीर शुक्ला यांच्या उपस्थितीत लाभांशाचा धनादेश सादर करण्यात आला.

दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी समाप्त झालेल्या वित्त वर्षामध्ये बँक ऑफ महाराष्ट्रने प्रत्येक समभागामागे रु १.३० म्हणजेच १३ % लाभांश घोषित केला आहे. सदर लाभांशामुळे सदर वित्तीय वर्षात बँकेने बजावलेली चमकदार कामगिरी दिसून येत आहे. मागील वित्तीय वर्षीच्या रु ११५२ कोटी नफ्याच्या तुलनेत सद्य वित्तीय वर्षात बँकेच्या निव्वळ नफ्यात १२५.९६% वाढ झाली असून बँकेने रु २६०२ कोटी एवढा निव्वळ नफा नोंदविला आहे.

बँक ऑफ महाराष्ट्राने सातत्याने चमकदार कामगिरी केली असून मजबूत मुलभूत संकेतकांसह वित्तीय वर्ष २०२१, वित्तीय वर्ष २०२२ व वित्तीय वर्ष २०२३ मध्ये ठेवी व कर्ज व्यवसाय वाढीत सार्वजनिक बँकिंग क्षेत्रात अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे. बँक ऑफ महाराष्ट्राच्या नफा क्षमतेतील लक्षणीय वाढीमुळे सर्व प्रकारची आव्हाने पेलून तगडी कामगिरी करण्याची बँकेची क्षमता अधोरेखित होत आहे.

बँक ऑफ महाराष्ट्राच्या चमकदार वित्तीय कामगिरीमुळे वर्षागणिक बँकेची स्थिती मजबूत व बँकिंग क्षेत्रातील एक यशस्वी खेळाडू म्हणून दुगोच्चर होत आहे. बाजारपेठेच्या गरजा व मागणी प्रमाणे स्वतःला ढाळून बँकेने सातत्याने लवचिकता व अनुकूलनक्षमता दाखवून कामगिरीत अव्वल क्रमांक कायम राखला आहे. अलीकडेच बँकेने तिमाही देकार प्रक्रियेच्या ( QIP ) द्वारे रु १००० कोटी रकमेची भांडवल उभारणी यशस्वीपणे केली आहे. त्यातून गुंतवणूकदारांचा बँकेवर असलेला विश्‍वासच अधोरेखित होतो आहे.

.

बँक ऑफ महाराष्ट्राच्या चमकदार वित्तीय कामगिरीत बँकेच्या कर्मचाऱ्यांनी दाखविलेली समर्पित वृत्ती व केलेले सामुहिक प्रयत्न तसेच बँकेने वेळोवेळी घेतलेल्या महत्वपूर्ण धोरणात्मक व प्रचालानात्मक निर्णयांचा देखील समावेश आहे. यामुळे डिजिटल व सुलभ बँकिंगवर लक्ष केंद्रित करून वाढीव नफा व व्यावसायिक विकासाचा मार्ग बँकेने अनुसरला आहे.

आजघडीला बँक ऑफ महाराष्ट्रचे देशभरातील २८ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेशांमध्ये २२१० शाखा व २३50 एटीएम केंद्रांचे व्यापक जाळे आहे.


Bank of Maharashtra
HEAD OFFICE PUNE
GOVERNMENT OF INDIA
SEVEN HUNDRED NINETY FIVE CRORES NINETY FOUR LAKHS
SIXTEEN THOUSAND THREE HUNDRED FIVE ONLY
₹ 7,95,94,16,305
S.D-Bank Of Maharashtra